06 OCT 2026
सिंधुदुर्ग समाचार
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्यास दर्जेदार व कौशल्यपूर्ण शिक्षण देता येईल : कुलगुरु



**गारगोटी/प्रतिनिधी :**

डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापरच ग्रामीण आणि शहरी शैक्षणिक दरी कमी करू शकेल. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्यास शैक्षणिक गुणवत्ता, दर्जा व कौशल्यपूर्ण शिक्षण देता येईल. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाची चांगली सोय होईल. मौनी विद्यापीठाच्या माध्यमातून यासाठी सुरू असलेल्या विविध शैक्षणिक प्रयोगांना शिवाजी विद्यापीठाचे सर्वोतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.रजनीश कामत यांनी दिली.

येथील श्री मौनी विद्यापीठातर्फे आयोजित 'तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण- शहरी शैक्षणिक दरी कमी करणे' या विषयावरील मुक्त संवाद कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. मौनी विद्यापीठाचे चेअरमन मधुकर देसाई अध्यस्थानी होते. नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात, गरवारे टेक्निकल फायबर्सचे अध्यक्ष डॉ. संजय चराटी, डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण संकुलाच्या सीईओ देवश्री पाटील, माजी प्राचार्या डॉ. अनिता बोडके, मौनी विद्यापीठाच्या विश्वस्त सौ. पल्लवी कोरगावकर, सदस्य बाजीराव चव्हाण, कर्मचारी प्रतिनिधी डॉ. अरविंद चौगले, जिल्हा बँकेचे संचालक प्राचार्य अर्जुन आबिटकर प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, मौनी विद्यापीठात विविध कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे केंद्र सुरू केले जाईल. येथे अनेक लहान अभ्यासक्रम सुरू केले जातील. यासाठी शिवाजी विद्यापीठ पूर्णतः सहकार्य करेल. 'एक विद्यापीठ, दहा महाविद्यालये, शंभर शाळा' हा उपक्रम शिवाजी विद्यापीठाने हाती घेतला असून यामध्ये मौनी विद्यापीठाचा पहिला समावेश असेल. कमी कालावधीच्या अभ्यासक्रमांकडे सध्या विद्यार्थ्यांचा वाढता कल आहे. यासाठी त्यांच्या ऑनलाइन शिक्षण व थेट कृतीयुक्त प्रशिक्षणावर भर दिला जाईल.

ते म्हणाले, सद्या तंत्रज्ञानाचा वापर करून स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती होईल असे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. तंत्रज्ञान रोजगारावर हिरावत नाही तर तंत्रज्ञानामुळे रोजगाराचे स्वरूप बदलते. 'ए. आय.' तंत्रज्ञानामुळे नोकऱ्या जाणार नसून नोकऱ्यांचे स्वरूप बदलणार आहे. येत्या काळात या क्षेत्रात ४० लाख नवीन रोजगार निर्मिती होणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देणे महत्त्वाचे आहे.

डॉ. यशवंतराव थोरात यांनी विषयाची मांडणी केली. ते म्हणाले, ग्रामीण आणि शहरी भागातील शैक्षणिक दरी कमी करणे ही काळाची गरज आहे. सोशल मीडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (ए. आ.) तंत्रज्ञानामुळे ग्रामीण व शहरी भागातील अंतर मोठ्या प्रमाणात कमी झाले. बदलत्या तंत्रज्ञानामुळे शहरी विद्यार्थ्याप्रमाणेच ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध झाल्या आहेत. मात्र आजही गुणवत्ता, दर्जा, रोजगाराच्या संधी यामध्ये ग्रामीण विद्यार्थी पाठीमागे आहे. यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि मौनी विद्यापीठाने पुढाकार घेणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांच्यात शिकण्याची क्षमता वाढविणे, विविध कौशल्ये आत्मसात करण्यासाठी त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे क्रमप्राप्त आहे.

शिवाजी विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना सतत आवश्यक ज्ञान आणि तंत्रज्ञान उपलब्ध व्हावे. हे विद्यापीठ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या क्षमता निर्मिती आणि प्रत्यक्ष रोजगार देण्यातील दुवा ठरावे.

चेअरमन मधुकर देसाई म्हणाले, मौनी विद्यापीठाची ग्रामीण विद्यापीठ म्हणून आजही ओळख आहे. येथे विविध अभ्यासक्रम शिकविले जात असून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मौनी विद्यापीठ गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध आहे. दर्जेदार व नवीन तंत्रज्ञानातील अद्यावत व्यावसायिक व कौशल्यपूर्ण शिक्षण देण्यावर आमचा भर राहिल. रोजगाराभिमुख शिक्षण, संशोधन, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रभावी केंद्र करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

प्राचार्य डॉ. उदयकुमार शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. संजय चराटी यांनी मनोगत व्यक्त केले. मौनी विद्यापीठाचे संचालक डॉ. पी. बी. पाटील यांनी आभार मानले. उपप्राचार्य डॉ. संजय देसाई, स्वप्नील तांबेकर यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक उपस्थित होते. डॉ. ऋतुजा लाड यांनी सूत्रसंचालन केले. कर्मवीर हिरे महाविद्यालयाने कार्यक्रमाचे संयोजन केले.

## चाकोरीबाहेरच्या शिक्षणाचा पहिला प्रयोग

ग्रामीण भागातील शिक्षणाच्या सक्षमीकरणासाठी शिवाजी विद्यापीठ पुढाकार घेणार आहे. मौनी विद्यापीठाला चांगली शैक्षणिक परंपरा आहे इथूनच ग्रामीण शिक्षणाची पाळेमुळे रुजली गेली. यामुळे मौनी विद्यापीठासारख्या संस्थांच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठ ग्रामीण शिक्षण सक्षमीकरणाचा प्रयोग राबविणार आहे. चाकोरीबाहेरच्या शिक्षणाचा हा देशातील पहिला प्रयोग असेल, असा विश्वास कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केला. तर यावेळी नियम, कायदा शिकवण्यापेक्षा विचार करायला शिकवणारे कुलगुरू डॉ. कामत आहेत असे गौरवोद्गार काढून माऊली विद्यापीठाला दिलेल्या विविध संधीबद्दल महासंचालक डॉ. यशवंतराव थोरात यांनी त्यांचे आभार मानले.

06 OCT 2026

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठात अभिजात मराठीचे गौरवगान; प्रेक्षकांचा जल्लोषी प्रतिसाद

# लाभले आम्हांस भाग्य...

**अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेल्या मायमराठीचे जतन, संवर्धन आणि प्रचार, प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रतिबद्ध आहे. त्यासाठी राज्यभरात अनेक वैविध्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनीही मराठीच्या संवर्धनासाठी आपला वाटा उचलण्यास सिद्ध व्हावे, असे आवाहन राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे यांनी काल येथे केले.**




कोल्हापूर : अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त आयोजित 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' या सांगितिक-सांस्कृतिक कार्यक्रमात लोककला सादर करताना विद्यार्थी.

### कोल्हापूरच्या सुपुत्रांनी गाजविला कार्यक्रम

कोल्हापूरचे सुपुत्र सुप्रसिद्ध गायक बंधू डॉ. अभिजीत कोसंबी आणि प्रसेनजीत कोसंबी यांनी आपल्या गायनवैविध्याने अभिजात मराठीचा हा कार्यक्रम गाजविला, भक्तीगीतांपासून वासुदेव गीतांपर्यंत आणि आदिवासी गीतांपासून चित्रपट गीतांपर्यंत अशी अनेकविध गीते गाऊन त्यांनी कार्यक्रमात मोठी रंगत आणली. दिगंबर नाईक यांनी संयोजन केले.

| त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात काल सायंकाळी महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अभिजात मराठी भाषा सप्ताह-२०२६ या उपक्रमांतर्गत आयोजित 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' या सांगितिक-सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. देवरे बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित होत्या.

अभिजात मराठी भाषेचे गौरवगान करणाऱ्या या कार्यक्रमास प्रेक्षक, श्रोत्यांचा प्रचंड जल्लोषी प्रतिसाद लाभला.

याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, मराठी भाषेच्या अनेक बोलींमध्ये कोल्हापूरची मराठी ही केवळ देशातच नव्हे, तर जगात वैशिष्ट्यपूर्ण आणि लोकप्रिय आहे. या भाषेचा आपण नेहमी अभिमान मिरवला पाहिजे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल राज्यभरातील विद्यापीठांत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठालाही या गोष्टीचा मोठा अभिमान असल्याने हा कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. येथून पुढेही असे मराठी भाषेच्या गौरवपर कार्यक्रम आयोजित करण्यात येतील.

प्रारंभी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी मंचावर कुलसचिव डॉ. विलास शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे उपस्थित होते.

06 OCT 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लाभले आम्हास भाग्य...आम्ही बोलतो मराठी, जाणतो मराठी

## शिवाजी विद्यापीठात अभिजात मराठीचे गौरवगान : प्रेक्षकांचा जल्लोषी प्रतिसाद : कोल्हापूरची मराठी जगात लोकप्रिय : डॉ. जाधव

**जनप्रवास : कोल्हापूर**

अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेल्या मायमराठीचे जतन, संवर्धन आणि प्रचार, प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रतिबद्ध आहे. त्यासाठी राज्यभरात अनेक वैविध्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनीही मराठीच्या संवर्धनासाठी आपला वाटा उचलण्यास सिद्ध व्हावे, असे आवाहन राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात सोमवारी सायंकाळी महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अभिजात मराठी भाषा सप्ताह -२०२६ या उपक्रमांतर्गत आयोजित




'अभिजात मराठी, अभिमान मराठी' या सांगितिक - सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. देवरे बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख होत्या.

अभिजात मराठी भाषेचे गौरवगान करणाऱ्या या कार्यक्रमास प्रेक्षक, श्रोत्यांचा प्रचंड जल्लोषी प्रतिसाद लाभला. उद्घाटन प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, मराठी भाषेच्या अनेक बोलींमध्ये कोल्हापूरची मराठी ही केवळ देशातच नव्हे, तर जगात वैशिष्ट्यपूर्ण आणि लोकप्रिय आहे. या भाषेचा आपण नेहमी अभिमान मिरवला पाहिजे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल राज्यभरातील विद्यापीठांत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठालाही या गोष्टीचा मोठा अभिमान असल्याने हा कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. येथून पुढेही असे मराठी भाषेच्या गौरवपर कार्यक्रम आयोजित करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी मंचावर कुलसचिव डॉ. विलास शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे उपस्थित होते.

कार्यक्रमाला विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी, विविध अधिकार मंडळांचे सदस्य, अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांची मोठी दाद या कार्यक्रमाला मिळाली.

### कोल्हापूरच्या सुपुत्रांनी गाजविला कार्यक्रम

कोल्हापूरचे सुपुत्र असलेले सुप्रसिद्ध गायक बंधू डॉ. अभिजित कोसंबी आणि प्रसेनजित कोसंबी यांनी आपल्या गायनवैविध्याने अभिजात मराठीचा हा कार्यक्रम गाजविला. भक्तिगीतांपासून वासुदेव गीतांपर्यंत आणि आदिवासी गीतांपासून चित्रपट गीतांपर्यंत अशी अनेकविध गीते गाऊन त्यांनी कार्यक्रमात मोठी रंगत आणली. दिगंबर नाईक यांचे नेटके संयोजन लाभलेल्या या कार्यक्रमात मराठी भाषेचे वैविध्य आणि वैभव दर्शविणाऱ्या गीतांबरोबरच मंगळागौर, लावणी, आदिवासी, गोविंदा, कोळीनृत्य इत्यादी नृत्यप्रकारांचेही सादरीकरण करण्यात आले. प्रेक्षकांचा त्यांना जल्लोषी प्रतिसाद लाभला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 OCT 2026
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी सायंकाळी 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' हा सांगीतिक-सांस्कृतिक कार्यक्रम रंगला.

# लाभले आम्हांस भाग्य..!

## शिवाजी विद्यापीठात अभिजात मराठीचे गौरवगान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : मराठी भाषेचे वैविध्य, वैभव दर्शविणाऱ्या 'लाभले आम्हांस भाग्य...' या गीतांसह मंगळागौर, लावणी, आदिवासी, गोविंदा, कोळीनृत्य आदी नृत्यप्रकारांच्या सादरीकरणात आज सायंकाळी शिवाजी विद्यापीठात 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' हा सांगीतिक-सांस्कृतिक कार्यक्रम रंगला.

विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात शासनाचा मराठी भाषा विभाग आणि विद्यापीठ यांच्यातर्फे अभिजात मराठी भाषा सप्ताहांतर्गत घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. आर. के. कामत, तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित होत्या.

'अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेल्या मायमराठीचे जतन, संवर्धन आणि प्रचार, प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध आहे. त्यासाठी राज्यभरात वैविध्यपूर्ण उपक्रम होत आहेत. विद्यार्थ्यांनी मराठीच्या संवर्धनासाठी आपला वाटा उचलण्यास सिद्ध व्हावे,' असे आवाहन देवरे यांनी केले.

'मराठी भाषेच्या अनेक बोलींमध्ये कोल्हापूरची मराठी ही केवळ देशातच नव्हे, तर जगात वैशिष्ट्यपूर्ण आणि लोकप्रिय आहे. या भाषेचा आपण नेहमी अभिमान मिरवला पाहिजे,' असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल राज्यभरातील विद्यापीठांत सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत. शिवाजी विद्यापीठालाही या गोष्टीचा मोठा अभिमान असल्याने हा कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. येथून पुढेही असे मराठी भाषेच्या गौरवपर कार्यक्रम घेण्यात येतील, असे कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे उपस्थित होते.

दरम्यान, या कार्यक्रमात गायक डॉ. अभिजित कोसंबी आणि प्रसेनजित कोसंबी यांनी आपल्या गायनवैविध्याने अभिजात मराठीचा कार्यक्रम गाजविला. भक्तिगीतांपासून वासुदेव गीतांपर्यंत आणि आदिवासी गीतांपासून चित्रपट गीतांपर्यंत अशी अनेकविध गीते गाऊन त्यांनी रंगत आणली. दिगंबर नाईक यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 6 OCT 2026

लोकमत

# विद्यापीठात अभिजात मराठीचा जागर; रंगला गौरव सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : अभिजात भाषेचा दर्जा लाभलेल्या मायमराठीच्या वैभवाचा जागर शिवाजी विद्यापीठात रंगलेल्या सुरेल स्वर आणि बहारदार नृत्याविष्कारातून झाला. भक्तिगीते, वासुदेवगीते, आदिवासी व चित्रपट गीतांसह मंगळागौर, लावणी, गोविंदा आणि कोळीनृत्याच्या सादरीकरणाने सोमवारी राजमाता जिजाऊ साहेब सभागृह दुमदुमले.

राज्य सरकारच्या मराठी भाषा विभाग आणि शिवाजी विद्यापीठातर्फे 'अभिजात मराठी भाषा सप्ताह-२०२६' अंतर्गत 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' या सांगितिक-सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे यांनी उद्घाटन केले. कुलगुरू डॉ. राजनीश कामत अध्यक्षस्थानी होते, तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. अभिजीत आणि प्रसेनजीत कोसंबी यांच्या गायनाने रंगत आणली. दिगंबर नाईक यांच्या संयोजनाखाली या कार्यक्रमात मंगळागौर, लावणी, आदिवासी, गोविंदा आणि कोळीनृत्यानेही रसिकांची मने जिंकली.




शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात सोमवारी विविध गीतांवर कलाकारांनी नृत्याविष्कार सादर केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

06 OCT 2026 पुढारी

# विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा २४ ऑक्टोबरपासून सुरू

## २३ अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिकांची ऑनस्क्रीन तपासणी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांना २४ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार आहे. या परीक्षांसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील दोन लाख ५० हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. बी. व्होक अभ्यासक्रमांच्या परीक्षा पहिल्या टप्प्यात होतील.

हिवाळी सत्रात पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ९९० परीक्षा होणार आहेत. अभ्यासक्रमनिहाय परीक्षा प्रारंभाच्या तारखांचे परिपत्रक विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने आज प्रसिद्ध केले आहेत. त्यात बी. ए., बी.कॉम., बी. एस्सी या अभ्याक्रमांच्या परीक्षांची सुरुवात २६ ऑक्टोबरला होणार आहे. या परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक लवकरच परीक्षा मंडळाकडून जाहीर केले जाणार आहे. पदवी आणि पदव्युत्तर २३ अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी ऑनस्क्रीन पद्धतीने होणार आहे. त्यात व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा समावेश आहे.

### दृष्टिक्षेपात

- अधिविभाग - ३४
- संलग्नित महाविद्यालये - २९१
- परीक्षांची संख्या - ९९०

### नोव्हेंबरमध्ये दीक्षान्त समारंभ

स्वयंम परीक्षा, सीएस अभ्यासक्रम आणि एमएचटी-सीईटी परीक्षा ज्या दिवशी असतील, त्यादिवशी संगणकाशी संबंधित परीक्षा, सार्वजनिक सुट्यांच्या दिवशी विद्यापीठाची कोणतीही लेखी अथवा प्रात्यक्षिक परीक्षा होणार नाही. विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ २७ नोव्हेंबरला होणार असून, त्यादिवशी परीक्षा होणार नाही. त्याची आणि परीक्षांच्या तारखांची माहिती अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे दिली असल्याचे परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
0 6 OCT 2026 कोतीसिंह शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वातंत्र्य सैनिकांचा ग्रंथ भावी पिढ्यांसाठी दीपस्तंभ




कोल्हापूर(प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेला गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची हा ग्रंथ देशाच्या आत्म्याशी संवाद साधणारा तसेच भावी पिढीच्या चारित्र्य निर्मितीचा दीपस्तंभ ठरणारा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आज महात्मा गांधी जयंतीच्या पूर्व संध्येला गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष आणि कला व साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. अरुण भोसले, गोवा मुक्ती संग्रामातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक वसंतराव माने प्रमुख उपस्थित होते.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठाने आपल्या शिववाणी युट्यूब वाहिनीवरुन गाथा स्वातंत्र्यसैनिकांची ही दैनंदिन मालिका वर्षभर सलग चालविली. या मालिकेतील स्वातंत्र्य सैनिकांच्या जीवनकार्याचे शब्दांकन करून त्याचे ग्रंथ रुपात संपादन करण्यात आले आहे. डॉ. अविनाश पाटील आणि डॉ. दत्तात्रय मचाले यांनी संपादन केले आहे. या ग्रंथाचे प्रकाशन डॉ. साळुंखे यांच्या हस्ते झाले.

डॉ. साळुंखे म्हणाले, स्वातंत्र्य चळवळ ही केवळ राजकीय लढाई नव्हती, तर ती नैतिक मूल्यांची क्रांती होती. सत्य, अहिंसा, स्वराज्य, शिक्षण, संविधान आणि राष्ट्रप्रेम यांसारखी मूल्ये स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या कृतीतून समाजासमोर ठेवली. त्यामुळे त्यांचा इतिहास नव्या पिढीला केवळ भूतकाळाची माहिती देणारा न राहता वर्तमानातील मूल्यजाणीव आणि भविष्याची दिशा देणारा ठरला पाहिजे. इतिहासाचे रोमँटीकरण न करता तो वास्तववादी असणे आवश्यक आहे; कारण इतिहास हा भूतकाळाचा केवळ संग्रह नसून भविष्याला दिशा देणारा स्रोत आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, आजच्या जेन-झीच्या काळात माहितीचा वेग वाढला असला, तरी मूल्य शिक्षणाचे महत्त्व त्याहून अधिक वाढले आहे. स्पर्धा, पैशाच्या निकषावर होणारे मूल्यमापन, सोशल मीडियाचा वाढता प्रभाव, कुटुंबातील कमी होत चाललेला संवाद आणि मनोरंजनाला मिळणारे प्राधान्य यामुळे मूल्यशिक्षण जीवन शैलीचा भाग बनविण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत शिक्षकांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. एआय माहिती देऊ शकते;मात्र प्रेरणा देण्याचे आणि विद्यार्थ्यांचे चारित्र्य घडविण्याचे काम शिक्षकांनाच करावे लागेल, असे सांगून डॉ. साळुंखे यांनी अशा ग्रंथांचा विद्यार्थ्यांच्या मूल्यशिक्षणासाठी प्रभावी वापर करण्याचे आवाहन केले. ज्ञान मिळवू, वेग जोपासू, यश मिळवू; पण मूल्य सोडणार नाही. स्वातंत्र्याचा लाभ घेऊ; पण स्वातंत्र्य सैनिकांचे ऋण कधीही विसरणार नाही, अशी भूमिका घेऊन युवा पिढीने पुढील वाटचाल करावी,असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. अरुण भोसले म्हणाले, स्वातंत्र्याचा संघर्ष आणि लढा हा प्रस्थापित किंवा अभिजनांनी नव्हे, तर जीवाची पर्वा न करता लढणाऱ्या सामान्य माणसांनी घडविला आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात राष्ट्रीय पातळीवरील नेते आणि सशस्त्र क्रांतिकारकांच्या कार्याला प्रारंभी अधिक महत्त्व मिळाले; मात्र गावागावांत, खेड्यापाड्यांत चेहरा विहीन, आवाजहीन असंख्य सामान्य माणसांनी केलेला त्याग आणि दिलेले बलिदान इतिहासाच्या मुख्य प्रवाहात पुरेसे नोंदले गेले नाही. गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची या ग्रंथाच्या माध्यमातून अशाच ज्ञात-अज्ञात, न-नायक ठरलेल्या सामान्य स्वातंत्र्यसैनिकांच्या संघर्षाचे दस्तावेजीकरण झाले असून त्यांच्या मनोगतांना शब्द आणि त्यांच्या कार्याला इतिहासात स्थान मिळाले आहे. दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील ३६६ ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांच्या शौर्यगाथा संशोधन, मुलाखती आणि उपलब्ध दस्तऐवजांच्या आधारे नोंदविणारा हा ग्रंथ मातीतील या न-नायकांच्या असामान्य पराक्रमाला दिलेली मानवंदना आहे. सामान्य माणूस हाच स्वातंत्र्य लढ्याचा खरा नायक होता, ही जाणीव पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या प्रकल्पातून झाले आहे, असे कौतुकोद्गार त्यांनी काढले.

देशाला मिळालेले स्वातंत्र्य सहज, सोपे किंवा स्वस्तात मिळालेले नाही; त्यामागे असंख्य स्वातंत्र्यसैनिकांचे त्याग, समर्पण आणि बलिदान आहे, याची जाणीव नव्या पिढीला करून देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी अध्यक्षीय मनोगतात केले. ते म्हणाले, आजच्या पिढीला स्वातंत्र्य हा सहज मिळालेला अधिकार वाटू शकतो; मात्र त्यासाठी सामान्य माणसांनी सोसलेल्या यातना, केलेला संघर्ष आणि दिलेले बलिदान समजून घेतल्याशिवाय त्याचे खरे मोल जाणवणार नाही. गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची हा ग्रंथ या अर्थाने महत्त्वाचा असून, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान नव्या पिढीसमोर जिवंतपणे मांडत त्यांच्याप्रती कृतज्ञतेची आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्याचे काम तो करेल. स्वातंत्र्याचा हा वारसा केवळ स्मरणात न राहता तो पुढील पिढ्यांच्या जाणिवेचा आणि कृतीचा भाग व्हावा, यासाठी या ग्रंथाचे योगदान महत्त्वपूर्ण ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी या उपक्रमाचे कोल्हापूर जिल्हा समन्वयक डॉ. धीरज हिंदे, सांगली जिल्हा समन्वयक डॉ. भरतभूषण माळी, सातारा जिल्हा समन्वयक डॉ. अजितकुमार जाधव, तसेच, प्राचार्य विलास पवार, चित्रकार राहुल रेपे, जनसंपर्क अधिकारी डॉ.आलोक जत्राटकर, निवेदक डॉ. सुस्मिता खुटाळे आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या तिन्ही जिल्ह्यातील नोंदलेख कांचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, पुष्प व ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्र संचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. इस्माइल पठाण, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. भारती पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, डी.जी. भास्कर यांच्यासह विविध अधिविभागांसह महाविद्यालयांतील शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि स्वातंत्र्यसैनिकांचे कुटुंबिय आणि नातेवाईक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हा
06 OCT 2026

पुढारी

# 'वंचित घटकांचे सिनेमातील स्थान'वर आजपासून विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'वंचित घटकांचे सिनेमातील स्थान' या विषयावर मंगळवारपासून (दि. ६) दोनदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. मास कम्युनिकेशन विभागात होणाऱ्या कार्यशाळेचे उद्घाटन मंगळवारी सकाळी ११ वाजता कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते होणार आहे. महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. पहिल्या दिवशी डॉ. विजय चोरमारे, अविनाश माले व प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी हे भारतीय चित्रपटातील वंचितांचे स्थान, एलजीबीटीक्यूचे चित्रण व जागतिक सिनेमातील वंचितांचे प्रतिनिधित्व यावर मार्गदर्शन करतील. दुसऱ्या दिवशी अश्विनी धायगुडे-कोळेकर, डॉ. अनमोल कोठाडिया व अभिनेते-लेखक डॉ. मिलिंद शिंदे विचार मांडतील. विद्यार्थी, चित्रपट अभ्यासक, नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 OCT 2026
कुमारकोली

# 'वंचित घटकांचे सिनेमातील स्थान'वर शिवाजी विद्यापीठात दोन दिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर :** भारतीय आणि जागतिक सिनेमामध्ये वंचित घटकांचे प्रतिनिधित्व, त्यांचे चित्रण तसेच मुख्य प्रवाहातील सिनेमातील त्यांचे स्थान यावर सखोल चर्चा घडवून आणण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'वंचित घटकांचे सिनेमातील स्थान' या विषयावर ६ आणि ७ ऑक्टोबर रोजी दोनदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

मास कम्युनिकेशन विभागात होणाऱ्या या कार्यशाळेचे उद्घाटन ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते होणार आहे. अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

पहिल्या दिवशी ज्येष्ठ संपादक व चित्रपट अभ्यासक डॉ. विजय चोरमारे 'भारतीय चित्रपटातील वंचितांचे स्थान' या विषयावर मार्गदर्शन करतील. वंचित घटकांचे अभ्यासक अविनाश भाले 'डऋ-इढट+ चे सिनेमातील चित्रण', तर जागतिक सिनेमाच्या अभ्यासक प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी 'जागतिक परिदृश्यात वंचितांचा सिनेमा' या विषयावर विचार मांडतील.

दुसऱ्या दिवशी पुणे येथील चित्रशारदाच्या व्यवस्थापकीय संपादक अश्विनी धायगुडे-कोळेकर 'सिनेमातील लिंगाधारित पूर्वग्रह', तर चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया 'वंचितांच्या चित्रपटांचे भवितव्य आणि आव्हाने', तसेच ख्यातनाम अभिनेते व लेखक डॉ. मिलिंद शिंदे 'वंचित घटक आणि मुख्य प्रवाहातील सिनेमा' या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 OCT 2026

कुमार क्रांती

# महिलांच्या 'मार्केटिंग व विक्री कौशल्या'साठी विद्यापीठात सोमवारी एकदिवसीय कार्यशाळा

कोल्हापूर : महिलांच्या कौशल्याला व्यवसायाची जोड मिळावी आणि मार्केटिंग व विक्री क्षेत्रातील आवश्यक कौशल्यांची माहिती मिळावी, या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि इंडो काउंट फाऊंडेशन अंतर्गत महालक्ष्मी कौशल्य विकास केंद्र, गोकुळ शिरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'मार्केटिंग व विक्री कौशल्य' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात येत्या सोमवारी (दि. ५) सकाळी १० वाजता ही कार्यशाळा होणार आहे.

विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, इंडो काउंटचे सल्लागार प्रफ ,ल्ल संगारी आणि उमेदमे जिल्हा व्यवस्थापक दयानंद पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. व्यावसायिक मार्गदर्शक रविंद्र खैरे आणि जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी श्रीकांत जौंजाळ प्रमुख मार्गदर्शक असतील. कौशल्य



व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. रामचंद्र पवार हे अध्यक्षस्थानी असतील. कार्यक्रमाला प्रमोद कांबळे, ईश्वर पुजारी उपस्थित असतील.

महिलांना कौशल्य विकासाच्या माध्यमातून उद्योग व व्यवसायाच्या संधींची माहिती मिळावी, तसेच मार्केटिंग आणि विक्री कौशल्यांचा व्यावहारिक दृष्टिकोन विकसित व्हावा, यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. महिला प्रशिक्षणार्थी, व्यवसायाची सुरुवात करू इच्छिणाऱ्या महिला तसेच कौशल्यविकासात रुची असणाऱ्यांसाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरेल, अशी आशा केंद्राचे समन्वयक डॉ. राम चंद्र पवार यांनी व्यक्त केली.